**आर. सी. सी. क्रं. १०/२०१७**

**सरकार वि. शिवाजी.**

**नि क्र. ६५**

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ७ यांची जबानी**

**शपथेवर निवेदन करतो की,**

**नाव –** कैलास पांडुरंग जगताप,

**वय –** ५६ वर्षे, व्यवसाय **–** पोलिस उप निरीक्षक,

**नेमणुक –** पोलिस मुख्यालय नाशिक ग्रामीण, नाशिक.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकिल श्री. एन. पी. मोरे यांच्या मार्फत**

**०१.** दिनांक २१/०९/२०१६ रोजी चांदवड पोलिस स्टेशनला पोलिस हवालदार म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी गुन्हा क्रमांक १५३/२०१६, कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ भा. द. वी. प्रमाणे पोलिस ठाणे अंमलदार दिपक मोरे यांनी नोंद केला होता व तपास माझ्याकडे प्राप्त झाला. मी त्यानंतर फिर्यादीचे अवलोकन केले. दिनांक २२/०९/२०१६ रोजी पंचनामा केला होता. आता मला पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. क्रं. ६६** देण्यात आला. त्या ठिकाणावरुन दोनशे ग्रॅम वजनाचा ओबड धोबड दगड जप्त केला होता. तो दगड मी ओळखू शकतो. आता साक्षीदाराला वस्तु – अ वरील दगड दाखविला. तो तोच आहे. मी सदर दगड मुद्देमाल मोहरीर च्या ताब्यात दिला होता. आता मला सदर मुद्देमाल पावती दाखवली. सदर मुद्देमाल पावतीची छायांकित प्रत **वस्तु – ब** वर आहे. साक्षीदारांचे जाब जाबाब त्यांच्या सांगण्यावरुन नोंदविले होते. जखमीचे प्रमाणपत्र प्राप्त केले व दोषारोपपत्रात समाविष्ट केले. आरोपीविरुध्द सबळ पुरावा उपलब्ध झाल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. आज न्यायालयात एक आरोपी हजर आहे. दुसरा आरोपी पाहिल्यास ओळखू शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एम. सोनवणे यांच्यामार्फत**

**०२.** तथाकथीत घटना घडली त्याच वर्षीपासून मी चांदवड येथे कार्यरत

होतो. मी नक्की कोणत्या तारखेला रुजू झालो त्याची तारीख सांगता येणार नाही. तळेगाव रोही हे गाव शिंगवे दुर क्षेत्राच्या हद्दीत येते. शिंगवे दुर क्षेत्राचा कार्यभार चांदवड येथे रुजू झाल्यापासून माझ्याकडे होता. हे म्हणणे खरे नाही की, चांदवडला येण्यापूर्वीही मी चांदवड येथे नोकरी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, तळेगाव रोही येथील सर्व लोकांना मी ओळखत होतो. मी अविनाश अहिरे, पोलिस पाटील तळेगाव रोही यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, अविनाश अहिरे यांनी दिनांक २७/०८/२०१६ रोजी गाय चोरीबाबत फिर्याद दिली होती. हे मला सांगता येणार नाही की, गाय चोरीबाबत आरोपी क्रं. २ नवनाथ ठोंबरे याने अविनाश अहिरे याला माहिती दिली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या फिर्यादीवरुन गायी कत्तलखाण्याकडे जाणारा टेंपो पकडला व चांदवड येथे आणून कार्यवाही केली होती. हे मला आठवत नाही की, तो टेंपो या प्रकरणातील फिर्यादीचा नातेवाईकाचा होता किंवा कसे.

**०३.** तळेगाव रोही ते चांदवड अंदाजे २० कि. मी. अंतर आहे. मी चांदवड येथून २२ तारखेला पंचनाम्याकरीता गेलो होतो. मी, दोन पचांना व माझ्या लेखकाला घेवून गेलो होतो. पंच असरखेड येथील राहणारे होते. हे म्हणणे खरे आहे की, असरखेड हे गाव चांदवडच्या पच्छीमेला पाच – सहा कि. मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, तळेगाव रोही हे गाव चांदवड च्या दक्षिणेला विस कि.मी. अंतरावर आहे. पंचांना मी स्वतः बोलाविले होते. मी फोन करुन पंचांना बोलाविले होते. हे मला सांगता येणार नाही की, पंचांचे मोबाईल मला माहिती होते व त्यामुळे ते आमच्या पोलिस स्टेशनचे नेहमीचे पंच होते किंवा कसे. पंचांचे मोबाईल क्रमांक मला आमच्या कर्मचाऱ्यांकडून मिळाले होते. आमच्या कर्मचाऱ्यांनी पंच नेहमीचे आहे याबाबत सांगितले नाही. पंच पोलिस स्टेशनचे नियमीत पंच आहे किंवा कसे याबाबत मी तपास केला नाही. मी पंचांना त्या दिवशी सकाळी ८ वाजता बोलाविले होते. पंच आल्यानंतर त्यांना पंचनाम्याबाबत माहिती दिली व चार चाकी वाहनातून आम्ही घटनास्थळी गेलो. मी पंचाकडे त्यांना माहिती दिली त्यावेळी पूर्वी पंचनाम्याकरीता पंच म्हणून काम केले आहे किंवा कसे याबाबत विचारपूस केली नाही. आम्ही कोणत्या

चारचाकी वाहनाने गेलो होता व त्याचा क्रमांक आता मला आठवत नाही. वाहन कोणाचे होते हे मला सांगता येणार नाही. आम्ही तळेगाव रोही येथील फिर्यादीच्या गट क्रं. २३६ मध्ये गेलो होतो. आम्ही ०८.४५ वाजता त्या ठिकाणी पोहोचलो होतो. मी गट क्रं. २३६ बाबत सातबारा उताऱ्यावरुन शहानिशा केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्रं. २३६ बाबत आम्ही तोच गट क्रमांक असल्याची शहानिशा केली नाही. हे मला आठवत नाही की, गट क्रमांक २३६ चा सातबारा उतारा दोषारोपपत्रात समाविष्ट केला किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की, मौजे तळेगाव रोही येथील गट क्रं. २३६ देवस्थान ईनाम वर्ग – सहा जमीन आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, मी केवळ फिर्यादीच्या सांगण्यावरुन तो गट क्रमांक २३६ असल्याबाबत सांगितले आहे. गट क्रमांक २३६ असल्याबाबत मी त्यावेळी हजर असलेल्या चार पाच लोकांकडे शहानिशा केली होती. मला त्यांची नावे आता आठवत नाही. मी तथाकथीत घटनास्थळी एक ते सव्वा तास हजर होतो. मी साधारण १०.१५ वाजेपर्यंत त्या ठिकाणी होतो. मी त्यानंतर साक्षीदाराचे जवाब फिर्यादीच्या घराजवळ मळयात नोंदविले होते. फिर्यादीचे घर व तथाकथीत घटनास्थळ अंदाजे १०० फुट अंतरावर आहे. मी पाच ते सहा लोकांचे जवाब नोंदविले होते. मला त्याकरीता एक ते दिड तास लागला होता. सर्व जवाब मी हस्तलिखीत नोंदविले होते. जवाब मी व माझ्या लेखकाने दोघांनी लिहीले होते व प्रत्येक जवाब नोंदविण्या करीता साधारण पंधरा मिनीटे लागले आहे. त्यातील नवनाथा भोकनळ, कौतिक ठोंबरे, मुस्ताक पठाण व अजित चॉंदखान पठाण चार जवाब मी नोंदविले आहे व बेबी बाई चॉँदखॉ पठाण हिचा एक जवाब माझ्या लेखकाने लिहीला आहे. जवाब नोंदविण्याची प्रक्रिया ११.३० ते १२ पर्यंत संपली होती. हे मला सांगता येणार नाही की, आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये वहिवाट रस्त्यावरुन पूर्वीपासून वाद होते किंवा कसे. हे मला आठवत नाही की, सदर वहिवाट रस्त्यावरुन वाद झाल्याने त्यांच्यात चांदवड येथे एकमेकांविरुध्द तक्रारी झाल्या होत्या किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, रफिकचॉंदखॉ त्याच ठिकाणी होता.

**०४.** जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र कोणत्या तारखेला हस्तगत केले हे मला आठवत नाही. जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र लेखक उत्तम गोसावी याने नाशिक येथून

प्राप्त केले होते. हे म्हणणे खरे आहे की, वैद्यकिय प्रमाणपत्र हे माझ्या नेहमीचे पाहण्यातील आहे. हे म्हणणे खरे आहे की, वैद्यकिय प्रमाणपत्रावर ज्याचे प्रमाणपत्र असते त्याची सही किंवा अंगठा घेतला जातो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या लेखकाने सदर प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले हे माझ्या तोंडी पुराव्या शिवाय लेखी पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लेखकाने सदर प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्याचे मी खोटे सांगत आहे.

**०५.** हे म्हणणे खरे नाही की, दोन पंचासह तथाकथीत घटनास्थळी गेलो व पंचासमोर पंचनामा केला व साक्षीदारांचे जवाब नोंदविले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वस्तु – अ सारखे दगड कुठेही सहज उपलब्ध असतात. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत वस्तु – अ वरील दगड फिर्यादीने मला दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणातील सर्व दस्त मी पोलिस स्टेशनला बसून तयार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुध्द सबळ पुरावा उपलब्ध झाल्यावरुन दोषारोपपत्र दाखल केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, रफिकच्या चाँदखॉ च्या सांगण्यावरुन आरोपविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.12.22 18:01:29 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड.

समक्ष

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.12.22 18:01:33 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड.

**दिनांक – २२/१२/२०२५**